# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९६५ /२०२५ दि. १३ /०८/२०२५

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १६/०८/२०२५ रोजी दहिहंडी सणानिमित्ताने दिपेश म्हात्रे फाउंडेशन यांचेकडुन पंडित दिनदयाळ रोडवरील गणपती मंदिर रोड ते सम्राट चौक येथील व्यकंटेश दर्शन बिल्डींग या परिसरात दि. १५/०८/२०२५ रोजी रात्री २४:०० वाजेपासुन ते दि. १६/०८/२०२५ रोजी रात्रौ २४:००वा. पावेतो दहिहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** **१)** डोंबिवली रेल्वे स्टेशन कडून पंडित दिनदयाळ रोडने सम्राट चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गणपती मंदिरासमोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची सर्व वाहने गणपती मंदिराजवळ, डावीकडे वळण घेवुन जी.एन.गॅरेज, येलोरा सोसायटी मार्गे सम्राट चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** **२)** कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या पंडित दिनदयाळ रोडने, ठाकुरवाडी तसेच रेतीबंदर चौक येथुन सम्राट चौक मार्गे डोंबिवली पश्चिम रेल्वे स्टेशनकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सम्राट चौक, व्यकटेश सोसायटी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची सर्व वाहने सम्राट चौक येथे डावीकडे वळण घेऊन नाना शंकर शेठ रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १५/०८/२०२५ रोजी रात्रौ २४:०० वा. पासुन ते दिनांक १६/०८/२०२५ रोजी रात्रौ २४:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय **सादर,**

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.